(30)




# आझादी की जंग अब भी है जारी। अब हमारी बारी।

१) 'हा देश आम्हीच चालवू शकतो' असे भासवून, देशात सर्वप्रकारे फूट पाडून इंग्रजांनी १५० वर्षे हुकूमत केली 'त्याचप्रमाणे या देशात लोकशाही आहे', आम्हाशिवाय सामान्यांचे जगणे-मरणे, कोणतेही सरकारी-गैरसरकारी काम, कोणतेही सामाजिक, धार्मिक काम, सण-जयंत्या हे होवू शकत नाही, 'तुमची कसलीच अस्मिता टिकू शकत नाही' हे भासवून राजकीय पार्टयांनी गेली ६२ वर्षे स्वत:च्या लुटमारीकडे लोकांचे दुर्लक्ष ठेवून राज्य केले याकडे पुढच्या पिढीलाही ढकलणार का?

२) भ्रष्ट व्यवस्थेमुळे तरुणांना अपमान नसणाऱ्या, महागाई नुसार पगार देणाऱ्या, कष्टाच्या नोकऱ्याच नसल्याने तरुण हा नशेच्या रागाच्या व गुन्हेगारीच्या अधीन होतो, तरुणींनाही मानाचे काम मिळत नाही, हे सहन होते का? (अशांनी या आयुष्याला जबाबदार यंत्रणेविरुद्ध लढायचे सोडून उलट याच भ्रष्टांकडून सुपाऱ्या घेत आपल्याच पुढच्या पिढीसाठी लढणाऱ्या क्रांतिकारकांनाच दुखवायचे हे आत्म्याला पटते का?)

३) हे घटनेत बसते का? i) सामान्याला कर, महागाई, कायद्याचा धाक, उपासमारीमुळे गुन्हा केला तर गुरासारखा मार, जेल, या उलट देशाला उपासमारीत टाकणारे भ्रष्ट शिक्षेशिवाय सुखरुप! हा घाणेरडा अपमान घटनेत बसतो काय?
ii) हा देश सर्वांच्या जगण्यासाठी चालावा म्हणून आपण जे शंभर रुपये कर देतो त्यातील १० रु फक्त आपणांवर खर्च होतात, बाकी ९०रु. हे भ्रष्ट लोक स्वत:च्या अय्याशीसाठी लुबाडतात! वरुन विकास केल्याचा आव आणतात!
iii) पैसे घेऊन संसदेत व्होट देणे / प्रश्न विचारणे / धुमाकूळ घालून आपल्याच अब्जोरुपयांचा चुराडा करणे!
iv) जनतेच्या इच्छेविरुद्ध स्वत:चे पगार काही मिनिटात चारपटीने सर्वसंमतीने वाढवून घेणे, स्वत:च्या स्वार्थासाठी शेकडो वेळा घटना दुरुस्ती करणे पण ज्या स्वातंत्र्यासाठी (जनलोकपालासाठी) देश रस्त्यावर येतो तो कायदा ४० वर्षे टाळणे!
v) माणुसच काय तर प्रत्यक्ष देशाच्या जमिनी (भूमाफियांना), डोंगर (खाणमाफियांना), नद्या (वाळूमाफियांना) विकून पुर्ण निसर्गही या भ्रष्टांनी उध्वस्त केला आहे! (कर्नाटक, गोव्यानंतर आता कोकणचेही वाळवंट कसे होईल हे **'YOU TUBE'** मध्ये **SAVE KOKAN** मध्ये पहावे) ही सर्व निलामी घटनेत बसते का?

✡ जनलोकपाल कायदा म्हणजे रोजच्या जीवनातील शंभर रुपयांसाठी सतावणाऱ्या शिपायापासून ते केंद्रीय मंत्र्यापर्यंतच्या कोणत्याही भ्रष्टाला जन्मठेपेपर्यंत शिक्षा, सर्व भ्रष्ट पैसा त्याकडुन वसूल करणे, आपले कोणतेही सरकारी काम ठराविक वेळेत न झाल्यास त्या अधिकाऱ्याकडून आपणांस भरपाई, सीबीआय सारख्या भ्रष्टाचाराचा तपास करणाऱ्या यंत्रणा लोकपालाच्या अंमलात आणणे, भ्रष्टाचाराची शक्यता असलेले कोणतेही काम रोखणे, भ्रष्टाचाराच्या तक्रारदारांचे संरक्षण, भ्रष्टाचार विरोधी स्वतंत्र जलदगती कोर्ट, न्यायालयाप्रमाणे स्वतंत्र आर्थिक निधी असे अनेक लोकांचे राज्य आणणारे कायदे आहेत! या खऱ्या स्वातंत्र्यासाठी पुढची लढाई लढण्याचा बहुमान सोडाल काय?

**आवाहन!** या लढ्यासाठी सर्व देशवासीयांनी जात-धर्म, पक्ष-संघटना असे भेदभाव बाजूला ठेवून पुन्हा देशाला स्वतंत्र करण्यासाठी आपल्या रक्ताला जागावे! (विशेषत: वकील, इंजिनियर, अकाऊंटंट, तज्ञ अशांनी संपर्क साधावा)

लोकांपर्यंत संदेश पोहचू नये म्हणून सरकारने डीएनडी चे कायदे बनवले, यावर मात म्हणून सर्व लोकांनी स्वत:च्या मोबाईलवरुन START IACMUM हा संदेश ९००४१९०१९० यावर पाठवावा!

संपर्क : कार्यालय - www. iacmumbai.org, २८३११५६० / ८६०, भांडुप ९८२०४५१५०५,८२९१०७८५६१, मुलुंड ९६६४८९११५१, ९८१९५१९६६३, पवई ९०२९८८३४५६ कांजुर ९३२३७७८७११, ७७३८५७२५८८, चेंबूर ९०२९२२१९९२, ९९२०५५४३०४,

पुढच्या आमरण आंदोलनाला सज्ज रहा!

देशाचा विनाश दुर्जन नव्हे तर गप्प रहाणारे सर्व देशवासी करतात!